प्रकृतीशी समरूपता

प्रिय दाजी

यांजकडून संदेश

पूज्य श्री चारीजी महाराज

यांच्या 98 व्या जयंती निमित्त, कान्हा शांति वनम्, 24 जुलै 2025.

प्रकृतीशी समरूपता

प्रिय मित्रांनो,

विकासाचे सार त्यागात - सोडून देण्यात आहे

जेव्हा आपण एका बीजाकडे पाहतो, तेव्हा आपल्याला सत्याचे दर्शन होते. बीजापासून वृक्ष बनण्याकरिता जे काही आवश्यक असते, ते सर्व त्या बीजामध्ये असते: मुळे, खोड, फांद्या, पाने आणि फुले. परंतु आपले खरे स्वरूप, परिपूर्ण स्वरूप प्रकट करण्याकरिता, प्रथम त्या बीजाला अंकुरावेच लागते. त्याला आपले संरक्षक आवरण काढून टाकावे लागते. त्याग केल्यानेच जीवनाचा खरा आरंभ होतो.

हा निसर्गाचा पहिला धडा आहे: विकासाकरिता त्याग करणे – सोडून देणे अनिवार्य आहे.

मातृवृक्षाला, जुन्या वृक्षाला याची जाणीव असते. शरद ऋतूत, तो आपली पाने घट्ट धरून ठेवत नाही. ती पानगळ तो सहजपणे होऊ देतो, जेणेकरून त्या जागी नवी पालवी यावी. त्याला हे ज्ञात असते की कोणत्याही गोष्टीला घट्ट धरून ठेवल्याने, जीवनाचा झरा थांबतो. आपल्याला मात्र अनेकदा, याचे विस्मरण होते.

मातेचे हृदयही हे सत्य जाणते. तब्बल नऊ महिने दोन हृदये एक होऊन धडधडत असतात. मग जन्माचा क्षण येतो, जे त्यागाचे – सोडून देण्याचे – सर्वात प्रेमळ स्वरूप होय. ती तिच्या अस्तित्वाचाच एक भाग असलेल्या जीवाला स्वतःपासून मुक्त करते; त्याच्यावर प्रेम नसते म्हणून नव्हे, तर तिचे त्याच्यावर जिवापाड, असीम प्रेम असते म्हणूनच. जिथे एक जीव होता, तिथे आता दोन जीव आहेत, आणि प्रत्येक जीव चिरंतन प्रेम करण्यास स्वतंत्र आहे.

प्रेम-चक्र

तीन साधी सत्ये मिळून एक अंतहीन चक्र तयार होते –

1. विकासाकरिता त्याग आवश्यक आहे.
2. विकासातून प्रेम आपसूकच, स्वाभाविकत:च व्यक्त होते.
3. प्रेम करणे म्हणजे नियंत्रण सोडून देणे.

हे अगदी श्वासोच्छवासाप्रमाणेच आहे, प्रत्येक क्रिया ही पुढच्या क्रियेला जन्म देते: श्वास घेणे, श्वास सोडणे आणि त्यानंतर पुन्हा श्वास घेणे. याच पद्धतीने जीवनही पुढे सरकत असते.

जेव्हा आपण काही नवीन रचना करतो उदाहरणार्थ, एखादे गीत किंवा चित्र असो किंवा एखादे नवे नाते असो, तेव्हा त्यातून आपले प्रेमच व्यक्त होत असते. सृजनाची किंवा निर्मितीची ही उर्मी, प्रेमाच्या स्वतःला व्यक्त करण्याच्या आणि सर्वांना वाटून टाकण्याच्या गरजेतूनच जन्माला येते. प्रेमाने स्वतःला अनेक मार्गांनी व्यक्त केले आहे, अगदी सृष्टीच्या क्षोभातूनसुध्दा.

प्रेमामुळे गोष्टी बहरतात, वृद्धिंगत होतात. चारीजी म्हणत, “प्रेम हे जगाचे इंजिन आहे.” जगाचे रहाटगाडगे चालते, ते प्रेमाच्या इंजिनावर.

जेव्हा आपण काही नवीन रचना करतो उदाहरणार्थ, एखादे गीत किंवा चित्र असो किंवा एखादे नवे नाते असो, तेव्हा त्यातून आपले प्रेमच व्यक्त होत असते. सृजनाची किंवा निर्मितीची ही उर्मी, प्रेमाच्या स्वतःला व्यक्त करण्याच्या आणि सर्वांना वाटून टाकण्याच्या गरजेतूनच जन्माला येते.

एक विलक्षण विरोधाभास

इथे एक मोठा विरोधाभास आहे: एखाद्यावर खऱ्या अर्थाने प्रेम करायचे असेल, तर तुम्ही त्याला स्वातंत्र्य द्यायला हवे. सुरुवातीला हे अशक्यच वाटते. आपण एकाच वेळी प्रेम आणि त्याग कसे करू शकतो?

पण असा विचार करा: जर गुलाबाच्या कळीचे संरक्षण करणाऱ्या पाकळ्या उघडल्याच नाहीत, तर ती कळी फुलेल का? जर कोषाने आपले रेशीमधागे सोडले नाहीत, तर त्यातून फुलपाखरू बाहेर येऊ शकेल का? जिथे विशिष्ट अपेक्षांची पूर्तता करावी लागत असेल, तिथे हृदये कशी जुळतील?

जे प्रेम सच्चे असते त्यात कोणत्याही अपेक्षा, मागण्या किंवा बंधने नसतात. ते मुक्त असते. खरी अलिप्तता म्हणजे उदासीनता नव्हे; तर प्रेमच इतके मजबूत असते की मालकी हक्क गाजवण्याऐवजी ते तुम्हाला मुक्त करते, स्वातंत्र्य देते.

अनेकदा, प्रेम आणि आसक्ती यांमध्ये आपण गल्लत करतो पण आसक्ती म्हणजे प्रेमाच्या आवरणाखाली दडलेले भय होय. ते काळजीच्या नावाखाली पिंजरे तयार करते. ते भक्तीच्या नावाखाली लोकांना परावलंबी बनवते.

याबाबतीत वनस्पतीला अधिक जाण असते. ती जाणते की वारा तिचा सुगंध दूर वाहून नेईल. तिला ज्ञात असते की तिची फळे एके दिवशी गळून पडतील. पण ती याला विरोध करत नाही. ती वाढतच राहते. वाढणे, स्वातंत्र्य देणे आणि जीवनाचे अधिकाधिक सृजन करणे, हा तिचा स्वभावधर्म आहे.

मानवी अस्तित्वाची आव्हाने

आपण मानव स्वतःचे निर्णय घेऊ शकतो आणि स्वतःबद्दल जागरूक राहू शकतो. तथापि, अहंकार 'मी' आणि 'माझे' हा अहंभाव आपल्यात निर्माण करतो, ज्यामुळे आपण गोष्टींना घट्ट धरून ठेवतो आणि त्यांच्या बळावर स्वतःची ओळख निर्माण करतो. विश्वास किंवा श्रद्धेचा अभावदेखील, आपल्याला भविष्याच्या सुरक्षिततेसाठी, गोष्टींचा संग्रह करण्यास प्रवृत्त करतो.

जेव्हा आपण ध्यान करतो आणि उत्तरोत्तर, आपल्या विचारांबद्दल व भावनांबद्दल अधिक जागरूक, संवेदनशील होतो, तेव्हा ही बंधने तुटतात. आपल्याला सत्य आणि असत्य, शाश्वत आणि नश्वर यांच्यातील फरक उमजू लागतो. आपण आपल्या मर्यादित 'स्व'च्या – स्थूल अस्तित्वाच्या पलीकडची अनंताची अनुभूती घेऊ लागतो.

हा बदल, स्वतःच, एक प्रेमपूर्ण कृती आहे.

पूज्य लालाजींच्या जीवनातील एक प्रसंग

आपले आदिगुरू पूज्य लालाजी महाराज, हे प्रेमपूर्ण विरक्तीचे सर्वोत्तम उदाहरण होते. एकदा सामूहिक ध्यानाचे संचालन करत असताना, त्यांना आपल्या मुलीच्या मृत्यूविषयी समजले. ते शांत बसून राहिले आणि मग त्यांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या.

एका सत्पुरुषांनी विचारले, "एक संत असे कसे रडू शकतात?"

ते कसे रडू शकतात? का नाही, कारण संतांमध्येसुध्दा माया असते, प्रेम असते.

लालाजी काही वेळ शांत बसले, मग त्यांनी काही सुकलेली पाने उचलून चुरगाळली. त्यातून चरचर आवाज आला. ते म्हणाले, "निर्जीव पानेसुध्दा चुरगाळल्यावर आवाज करतात," आणि पुढे म्हणाले, "मी वास्तवात एक सामान्य माणूस आहे. जेव्हा जोडलेले भाग विलग होतात, तेव्हा वेदनेचा ध्वनी तर स्वाभाविकच आहे."

ते पुढे म्हणाले, “मनुष्य, मग तो मुक्त असो वा नसो, त्याला प्रेम, माया आणि आसक्ती वाटणे हे अगदी स्वाभाविक आहे.”

आपण मानवतेकडून करुणेकडे आणि करुणेकडून दिव्यत्वाकडे प्रवास करत आहोत. जसजसे आपण विकसित होत जातो, तसतसे आपण सृष्टीच्या सत्यांपासून वेगळे न राहता, त्यांच्याशी समरूप होतो.

हीच आहे प्रेमपूर्ण विरक्ती: त्याग करताना किंवा सोडून देतानासुद्धा भावनाशील, संवेदनशील राहणे.

आपण मानवतेकडून करुणेकडे आणि करुणेकडून दिव्यत्वाकडे प्रवास करत आहोत. जसजसे आपण विकसित होत जातो, तसतसे आपण सृष्टीच्या सत्यांपासून वेगळे न राहता, त्यांच्याशी समरूप होतो.

एक भ्रामक मार्ग

आपण प्रेमविरहित विरक्तीबद्दल मात्र, सावध राहिले पाहिजे. प्रेमविरहित विरक्ती म्हणजे थंड, कठोर भावनाशून्य असणे ज्याचे आध्यात्मिक मूल्य काहीच नाही. हे स्वतःला ब्रह्मचारी म्हणविणाऱ्या माणसाप्रमाणे होय, जो कोणाशीही भावनिक जवळीक साधू शकत नाही. अशा प्रकारचा दुरावा ज्ञानी असल्यामुळे नव्हे, तर भावनिक असमर्थता असल्यामुळेच येतो.

संपूर्ण विरक्ती ही प्रबळ प्रेमातून जन्माला येते, ज्याला काही गमावण्याची किंवा मिळविण्याची पर्वा नसते. असे प्रेम, हे जीवनात पूर्णपणे सहभागी होत असले, तरी भावनिकरीत्या अवलंबून नसते. ते जवळीक निर्माण करते परंतु त्यात आसक्ती नसते. ते नाते जोडते परंतु ते जखडून न ठेवणारे नाते असते.

ही प्रेमपूर्ण अलिप्तता आपण कशी साधू शकतो? माझ्याकडे एकच उत्तर आहे: समज आणि सराव.

छोट्या गोष्टींपासून सुरुवात करा. एखादी मौल्यवान वस्तू, जसे की एखादा दागिना किंवा चित्र जवळ ठेवा. त्याबद्दल कृतज्ञता बाळगा. ती गमावण्याची चिंता वाटते का, हे तपासा. आता जाणीवपूर्वक, त्यावरची आपली पकड ढिली करा. तिला बंद मुठीत न ठेवता, उघड्या हातांवर ठेवा. एखाद्या गोष्टीचे मूल्य जाणणे आणि तिच्यावर मालकी हक्क गाजवणे यांतील फरक ओळखा.

नात्यांबद्दल विचार केल्यास आपल्याला असे जाणवेल की आपण बहुधा भीती, गरज किंवा अपेक्षेपोटी नात्यांना घट्ट धरून ठेवत असतो. आनंदाने इतरांना स्वातंत्र्य द्या. नातेसंबंध न तोडता, निरपेक्ष प्रेम करा आणि मग पाहा की स्वातंत्र्य हे खरी नाती कमकुवत नव्हे, तर अधिक मजबूत कसे बनवते!

शेवटी, हाच सराव स्वतःच्या बाबतीत करा. तुम्ही तुमच्या ओळखी, तुमच्या कथा आणि तुमच्या जखमांनासुद्धा कसे घट्ट धरून ठेवता, ते पाहा. सरावाचा भाग म्हणून स्वतःच्या जुन्या स्वरुपांना सोडून द्या. ज्या गोष्टी आता तुमच्या भल्याच्या नाहीत, तुम्हाला उपयुक्त नाहीत, त्यांचा त्याग करा; तुम्ही स्वतःचा द्वेष करता म्हणून नव्हे, तर तुमचे स्वतःवर प्रेम आहे, म्हणून.

निसर्गामधील करुणेचा बोध

जर तुम्ही नदीकिनारी निवांत थांबलात, तर ती तुम्हाला सर्वकाही शिकवेल. तिच्या प्रवाहाकडे पाहा. ती ज्या खडकांना स्पर्श करते किंवा ज्या किनाऱ्यांचे पोषण करते, त्यांना ती कधीच धरून ठेवत नाही. नदी प्रत्येक क्षणी आपले सर्वस्व अर्पण करते, तरीही ती आहे तशीच राहते. स्वतःला झोकून देऊन सतत अर्पण करत राहिल्यानेच ती स्वगृही सागराला जाऊन मिळते.

पण निसर्गाचे धडे याहूनही गहन आहेत. विचार करा: संत्र्याचे झाड आपल्या फळांच्या बदल्यात, रोज सकाळी संत्र्याचा रस मागत नाही. आंब्याचे झाड मोबदला म्हणून

आंब्याचा रस कधीच मागत नाही. ही झाडे साध्या गोष्टींचे रूपांतर मधुर भेटींमध्ये करतात. ती केवळ सेंद्रिय कचरा खातात, पाणी पितात आणि सूर्यप्रकाशाचा उपयोग करतात.

गाय आपल्याला दूध देण्याच्या बदल्यात, कोणतीही अपेक्षा करत नाही. ती फक्त गवत, गवत आणि गवतच खाते! पण आपल्यापैकी काही जण तिलाच खाऊन टाकतात आणि स्वतःच्या पोटाला, आपली निःस्वार्थ सेवा करणाऱ्या त्या जीवाची स्मशानभूमी बनवतात.

यातून आपण काय शिकवण घेऊ शकतो? आपण प्रत्येक बाबतीत, सर्वोत्कृष्ट गोष्टींचा आस्वाद घेतो, पण त्याबदल्यात आपण काय परत देतो? या प्रश्नाने, माझ्या सहकाऱ्यांना अनेकदा, अंतर्मुख होऊन विचार करण्यास प्रवृत्त केले आहे.

मला सदैव, असे वाटत आले आहे की केवळ दिव्यतेवरील प्रेमच या तीन गरजा पूर्ण करू शकते: प्रगल्भ होणे, प्रेम करणे आणि स्वातंत्र्य देणे. निसर्ग प्रेमावर आधारित आहे; तो काहीही मागत नाही, तर तो सर्वकाही वाटतो, बहाल करतो. हे प्रेमपूर्ण विरक्तीचे सर्वोच्च स्वरूप आहे.

प्रेमपूर्ण विरक्ती याविषयी हा निसर्गाचा मूक संदेश आहे, जी इतकी मूलभूत आहे परंतु त्याकडे अनेकदा, दुर्लक्ष केले जाते.

मला सदैव, असे वाटत आले आहे की केवळ दिव्यतेवरील प्रेमच या तीन गरजा पूर्ण करू शकते: प्रगल्भ होणे, प्रेम करणे आणि स्वातंत्र्य देणे. निसर्ग प्रेमावर आधारित आहे; तो काहीही मागत नाही, तर तो सर्वकाही वाटतो, बहाल करतो. हे प्रेमपूर्ण विरक्तीचे सर्वोच्च स्वरूप आहे.

ढग पाणी गोळा करतो, पावसाने भरून येतो – जड होतो आणि मग संपूर्णत: बरसतो. त्यामुळे तो लहान होतो का? नाही. तर त्याचे स्वरूप बदलते, तो हलका होतो आणि आकाशात पुढे सरकत, फिरत राहतो. तो पाऊस नद्या बनतो, बीजांचे पोषण करतो आणि पुन्हा वाफ होऊन वर जातो व त्याचे ढगात रूपांतर होते.

तुमचा श्वासही हेच शिकवतो. जेव्हा तुम्ही श्वास सोडता, तेव्हा तुम्ही काहीतरी त्यागता; सोडून देता व जेव्हा तुम्ही श्वास घेता, तेव्हा तुम्ही काहीतरी स्वीकारता, आत घेता. परंतु तुमचा श्वास कायमचा रोखून धरण्याचा प्रयत्न केलात, तर जीवन स्वतःच त्याला विरोध करेल. धरून ठेवणे आणि सोडणे – जाऊ देणे, हे जीवनाच्या नृत्याचे दोन अविभाज्य भाग आहेत. हे आपले शरीर जाणते परंतु मनाला त्याचा कधीकधी विसर पडतो.

चौथे सूत्र – निसर्गाचा मार्ग सरळ सोपा आहे

“प्रकृतीशी सहज समरूप होऊ शकेल, असे आपले जीवन साधेसुधे व सर्वसामान्य बनवावे.” – बाबुजी.

जीवनात या तत्त्वाचा अंगिकार करणे, हा उत्क्रांत होण्याचा सर्वात जलद मार्ग आहे.

निसर्गाचे संपूर्ण सार हे साधेपणात आहे. जे परमतत्त्वामध्ये अस्तित्वात होते परंतु त्याचे स्वरूप, पूर्णत्वाने प्रकट झाले नव्हते, ते अमूर्त होते. हीच सृष्टीची – निसर्गाची जीवनशक्ती आहे, जिथून सर्व क्रियाकलाप सुरू होतात आणि जे खऱ्या अर्थाने मूळ उगमस्थान आहे.जीवनातील अवघी गुंतागुंत, जटिलता दूर करणे, हाच साधेपणा प्राप्त करण्याचा एकमेव मार्ग आहे.

पण आपण मानवांनी या साध्या गोष्टीला अति गुंतागुंतीचे – क्लिष्ट बनविले आहे. आपण विचार, इच्छा आणि कृती यांचे असे जाळे विणले आहे, जे निसर्गाच्या प्रवाहाविरुद्ध जाते. ते निसर्गनियमाशी सुसंगत नसते. कोणी मोकळ्या हवेत फिरण्याचा सल्ला देतो, तर कोणी सर्दी होण्यापासून सावध करतो. कोणी पैसे कमविण्यास

सांगतो, तर कोणी वेगळा मार्ग स्वीकारण्यास सांगतो. बाबुजी याला परस्परविरोधी प्रवृत्तींचा "एक संपूर्ण समूह" म्हणतात.

संत्र्याच्या झाडाला यापैकी कोणत्याही समस्येला सामोरे जावे लागत नाही. ते फळ द्यावे की नाही, याचा विचार करत नाही. गाय दूध द्यावे की नाही, याचा विचार करत नाही. ते निसर्गाप्रमाणेच, परिपूर्ण साधेपणाने जगतात.

आपण स्वतःच निर्माण केलेले हे जाळे तोडून "आपल्या अंतरी निसर्गाचे – दिव्यतेचे सारतत्व आहे – त्या सुप्त शक्तीला पुनरुज्जीवित करणे, जागृत करणे" आवश्यक आहे. जर आपल्याला निसर्गाचे अनुकरण करायचे असेल, तर आपल्याला आपली कर्मे निरंतर सुधारावी लागतील, अनावश्यक गोष्टी – कार्ये काढून टाकावी लागतील आणि शुद्धतम अवस्था प्राप्त करण्याकरिता, आपली ही गुंतागुंतीची जाळी तोडावी लागतील.

हीच, कृतीतील प्रेमपूर्ण विरक्ती होय. हे अधिक आध्यात्मिक साधना करण्याबद्दल नसून सर्व अनावश्यक गोष्टी संपूर्णत: काढून टाकण्याबद्दल आहे. जसे, शरद ऋतूत वृक्ष आपली पाने सोडून देतो, त्याचप्रमाणे आपण तयार केलेले हे जाळे सोडून देण्यास शिकले पाहिजे. आपल्याला निसर्गाशी सुसंगत असलेल्या साध्या जीवनशैलीकडे परत जाणे आवश्यक आहे. आपण ज्या सर्वकाही गोष्टींचा उपभोग घेण्यात रममाण असतो, त्या सुखलोलुपतेच्या मुळाशी असलेल्या निकडीविषयी आत्मपरीक्षण करा.

जर आपल्याला निसर्गाचे अनुकरण करायचे असेल, तर आपल्याला आपली कर्मे निरंतर सुधारावी लागतील, अनावश्यक गोष्टी – कार्ये काढून टाकावी लागतील आणि शुद्धतम अवस्था प्राप्त करण्याकरिता, आपली ही गुंतागुंतीची जाळी तोडावी लागतील.

अंतिम सत्य

खरी समस्या, तर इथेच आहे. संत्र्याचे झाड माती, पाणी आणि सूर्यप्रकाशाचे रूपांतर मधुर फळांमध्ये करते, आणि बदल्यात काहीही मागत नाही. गाय गवत खाऊन त्याचे रूपांतर पौष्टिक दुधात करते, आणि बदल्यात कोणतीही अपेक्षा करत नाही. हीच दिव्यता होय, जी विचार न करता, केवळ देत राहणे, बहाल करणे जाणते.

आपण सर्वच बाबतीत, सर्वोत्कृष्ट गोष्टींचाच आस्वाद घेतो परंतु अनेकदा, हा मूलभूत नियम, मात्र, विसरतो.

आपण संत्र्याचे माधुर्य, गायीचे दूध आणि पृथ्वीची समृद्धी घेतो, पण त्याबदल्यात आपण काय परत देतो?

या प्रश्नामुळे आपल्याला आपल्यामधील खुजेपणाची जाणीव झाली पाहिजे व खऱ्या उद्दिष्टाचे स्मरण झाले पाहिजे.

ही मोठी समस्या आपोआपच नाहीशी होते; जेव्हा आपण त्याग करतो, तेव्हा आपल्याला त्याहून अधिक प्राप्त होते. आपण जितके अधिक स्वातंत्र्य देतो, तितके आपले बंध अधिक दृढ होतात. जेव्हा आपण त्याग करतो, तेव्हाच आपला विकास होतो, उत्क्रांती होते.

यात कोणतीही योजना किंवा युक्ती नाही. प्रेमाची हीच तऱ्हा असते व दिव्यतेचे कार्य असेच चालते. ज्याप्रमाणे हवा, पाणी आणि प्रकाश यांची सतत ये जा सुरू असते, त्यांचे स्वरूपही निरंतर, बदलत राहते, त्याचप्रमाणे प्रेम ही एक बंदिस्त प्रणाली नसून तो एक मुक्त झरा, प्रवाह आहे.

जेव्हा आपण दिव्यतेचे अनुकरण करत जीवन व्यतीत करतो आणि कोणत्याही अपेक्षेविना देत राहतो, तेव्हा आपल्याला जाणवते की प्रेमपूर्ण विरक्ती ही करण्याची गोष्ट नव्हे, तर ती आपली सहज प्रकृती होय.

स्वीकृती

शेवटी, आपण प्रेमपूर्ण विरक्तीचा सराव करत नाही, तर ती आपली सहज प्रकृतीच असते, हे जाणतो. आपण विलग नसून एकच आहोत व या अर्थाने एकमेकांपासून विलग होण्याचा प्रश्नच उरत नाही. जीवन हे सतत, बदलत असते, त्याग करत असते, सोडून देत असते व बदलत्या नवनवीन स्वरूपांमध्ये स्वतःला प्रेमपूर्वक पाहत असते.

हे विश्व, तुमच्या प्रत्येक श्वासागणिक तुमच्यासह असते व तुमच्या अस्तित्वावर प्रेम करते.

जेव्हा माता पोटचा गोळा जन्माला घालताना त्याला विलग होऊ देते, त्या स्वप्नाची व त्या क्षणाची आसक्ती सोडून देते, तेव्हा ती जीवनाच्या प्रवाहाशी समरूप असते, सुसंगत असते.

नदी जाणते की ती पुन्हा सागरालाच जाऊन मिळेल. ढग जाणतो की तो बरसेल, कोरडा होईल आणि त्यानंतर पुन्हा आकार धारण करेल. बीज जाणते की वाढण्यासाठी त्याला अंकुरावेच लागेल. आपणही अंतरीच्या गाभ्यातून जाणतो की प्रेम करणे म्हणजे त्याग करणे आणि प्रेमाने त्याग करणे म्हणजे स्वतःच प्रेम बनणे.

जेव्हा आपण साधेपणाच्या या स्तरावर पोहोचतो तेव्हा “सर्व इंद्रियांचे विलिनीकरण होऊन जी अवस्था प्राप्त होते, ती पूर्वसंस्कार पूर्णपणे लुप्त झाल्यानंतरच्या अवस्थेप्रमाणे असते.”

ज्याप्रमाणे हवा, पाणी आणि प्रकाश यांची सतत ये जा सुरू असते, त्यांचे स्वरूपही निरंतर, बदलत राहते, त्याचप्रमाणे प्रेम ही एक बंदिस्त प्रणाली नसून तो एक मुक्त झरा, प्रवाह आहे.

त्यानंतरच, आपण स्वतःला दिव्यतेशी सुसंगतीने आणि निसर्गाच्या साध्या, प्रेमळ आणि उदार व्यवस्थेशी पूर्ण सामंजस्याने, समन्वयाने जगत आहोत असे मानू शकतो.

निमंत्रण

हे शब्द अति गांभीर्याने घेऊ नका. त्यांना त्यांचे कार्य करू द्या आणि मग त्यांनाही जाऊ द्या, विसरा. या लक्षात ठेवण्यासारख्या गोष्टी नाहीत; तर प्रवाहित होण्यासाठी दिलेली निमंत्रणे आहेत.

जर तुम्हाला त्याग करण्याची, सोडून देण्याची भीती वाटत असेल, तर लक्षात ठेवा की त्यागामुळे नुकसान होत नाही, तर नवीन जीवनाचा आरंभ होतो. प्रत्येक पहाट हेच दर्शवत असते की प्रत्येक अंत, हा एका नव्या आरंभाकडे घेऊन जात असतो. प्रत्येक श्वास हेच दर्शवत असतो की श्वास सोडल्यानेच, पुन्हा श्वास घेण्यासाठी जागा निर्माण होत असते.

मुक्तहस्ते प्रेम करा. हे आध्यात्मिक आहे म्हणून नव्हे किंवा गंमत आहे म्हणूनही नव्हे, तर प्रेमाचा तोच एकमेव मार्ग आहे. बंद मूठ केवळ गोष्टी धरून ठेवू शकते परंतु उघड्या हातात संपूर्ण ब्रह्मांड सामावलेले असते. नदी जे शिकवते, ढग जे दर्शवतो आणि प्रत्येक मातेचे हृदय जे जाणते, ते हेच की प्रेम करणे म्हणजे त्याग करणे, सोडून देणे आणि त्यागाद्वारेच आपण ज्या प्रेमाच्या शोधात आहोत, ते प्रेम आपण स्वतःच बनतो.

हाच तो धडा आहे. सोपा. संपूर्ण. चिरंतन.

सप्रेम आणि सादर,
कमलेश.

पूज्य श्री चारीजी महाराज
यांच्या 98 व्या जयंती निमित्त, कान्हा शांति वनम्, 24 जुलै 2025.

heartfulness
purity weaves destiny